**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर,
वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368,
9860330587

दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ५ । अंक २६८ । शुक्रवार २४ जुलै २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

# बँकखाती भाड्याने देणाऱ्या १२ जणांवर गुन्हा दाखल

### अहिल्यानगर सायबर पोलिसांची कारवाई । गुन्हेगारांना साथ देणाऱ्यांना दणका

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सायबर गुन्हेगारांना स्वतःची बँकखाती भाड्याने देऊन फसवणुकीची रक्कम काढण्यास मदत करणाऱ्या १२ खातेदारांवर अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून, या कारवाईमुळे बँक खाती भाड्याने देणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.
सायबर गुन्हेगार सामान्य नागरिकांना पैशांचे किंवा कमिशनचे आमिष दाखवून त्यांची बँक खाती (म्युल अकाउंट्स) वापरण्यास घेतात. या खात्यांचा वापर देशभरातील नागरिकांची फसवणूक केलेली रक्कम जमा करण्यासाठी केला जातो. अहिल्यानगरमध्ये उघडकीस आलेल्या या प्रकरणात सुमारे ४० लाख रुपयांहून अधिक रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे निष्पन्न झाले आहे. ही रक्कम एटीएम व चेकद्वारे काढून मुख्य गुन्हेगारांना मदत केली जात होती. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेचे कलम ३१८(४), ३१९(२) आणि आयटी ॲक्टनुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

**सायबर पोलिसांचे आवाहन**

फसवणुकीची रक्कम खात्यात स्वीकारून ती काढून देणारे नागरिक या गुन्ह्यात थेट सह-आरोपी मानले जातात, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे. आपले बँक खाते, पासबुक, एटीएम कार्ड किंवा ओटीपी इतर कोणालाही वापरण्यास देऊ नका. कमिशनच्या आमिषाला बळी पडून अनोळखी किंवा अवैध पैसे खात्यात स्वीकारू नका. संशयास्पद व्यवहार आढळल्यास त्वरित जवळच्या पोलीस ठाण्यात किंवा राष्ट्रीय सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० वर संपर्क साधा, असे आवाहन सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांनी केले आहे.

## जेन-झीला ड्रग्स रॅकेटमध्ये अडकविण्याची धमकी देणाऱ्या पोलिसाची बडतर्फ करा

### मुख्यमंत्र्यांकडे ठाकरे शिवसेनेची मागणी । पस्तीस पुरणपोळ्या ऐवजी बदाम खाण्याचा देवाभाऊंना किरण काळेंनी लगावला टोला

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मुंबईमध्ये आंदोलन करणाऱ्या जेन-झीच्या काही मुलांना ताब्यात घेऊन पोलिसांनी ड्रग्स रॅकेटमध्ये अडकवण्याची धमकी दिली आहे. या प्रकरणात संबंधित पोलिसावर निलंबनाची कारवाई सरकारने केली आहे. नुसते निलंबन चालणार नाही. त्याच्यावर तात्काळ बडतर्फीची कारवाई करा, अशी मागणी अहिल्यानगर ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले आहे.
पोलिसांचा ड्रग्सशी काही संबंध समोर आला तर त्यांच्यावर थेट बडतर्फी केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात भाषण करताना महाराष्ट्राला दिले होते. त्याची आठवण करून देत पस्तीस पुरणपोळ्या ऐवजी दररोज सकाळी पस्तीस बदाम खा, म्हणजे तुम्हीच दिलेल्या आश्वासनांचा तुम्हाला विसर पडणार नाही, असा टोला मुख्यमंत्र्यांना काळे यांनी लगावला आहे.
या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. त्यावर संतप्त होत ठाकरे शिवसेना आक्रमक झाली आहे. किरण काळे म्हणाले, मुंबईतील सायन पोलीस ठाण्यातील कर्मचारी पवन सांगळे याने जेन-झी आंदोलनकर्त्यांना ड्रग्ज प्रकरणात अडकवण्याची धमकी दिल्याचा व्हिडिओ अत्यंत धक्कादायक असून, ही महाराष्ट्राच्या गृह खात्यासाठी लाजिरवाणी बाब आहे. अशा गंभीर प्रकरणात केवळ निलंबन नव्हे, तर तात्काळ बडतर्फीची कारवाई झाली पाहिजे.
दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनात पोलिसांवर दबाव ■ पान ४ वर

## ‘ज्ञानोबा–तुकाराम’च्या जयघोषात रंगला नवीन मराठी शाळा विश्रामबाग प्रशालेचा रिंगण सोहळा

### ७०० हून अधिक बाल वारकऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळा, विश्रामबाग येथे भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात बालदिंडी व रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. पूर्व प्राथमिक वर्ग तसेच प्राथमिक शाळेतील ७०० हून अधिक विद्यार्थी या बालदिंडीत उत्साहाने सहभागी झाले. बाल वारकऱ्यांच्या ‘विठ्ठल–विठ्ठल’ आणि ‘ज्ञानोबा–तुकाराम’च्या जयघोषाने संपूर्ण शाळा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.
पारंपरिक पद्धतीने विठ्ठल रुक्मिणीच्या मूर्तीची विधिवत पूजा करून बालदिंडीला सुरुवात झाली.बालदिंडीसाठी विद्यार्थ्यांनी आकर्षक वारकरी वेशभूषा परिधान केली होती. मुलांनी पांढरे शुभ्र पोशाख, गांधी टोपी, गळ्यात तुळशीच्या माळा, कपाळावर गंध–टिळा धारण केला होता, तर मुलींनी पारंपरिक वेशभूषेत सहभाग घेतला. हातात टाळ, चिपळ्या घेतलेल्या बाल वारकऱ्यांनी अभंग आणि भक्तिगीतांच्या तालावर उत्साहात दिंडी काढली.
बालदिंडीचे विशेष आकर्षण ठरले ते विठ्ठल–रुक्मिणीची वेशभूषा, टाळ–मृदंगाचा गजर आणि बाल वारकऱ्यांचा उत्साह! विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाची समृद्ध परंपरा आपल्या निरागस आणि उत्स्फूर्त सहभागातून जिवंत केली. बाल वारकऱ्यांच्या शिस्तबद्ध रांगा, पारंपरिक वेशभूषा आणि भक्तिमय घोषणांमुळे शाळेच्या परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद आणि उत्साह ■ पान ४ वर

## दांगटमळ्यातील घरफोडीचा छडा, आरोपीकडून मुद्देमाल हस्तगत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दांगटमळा, चेतना कॉलनी येथे घडलेला घरफोडी गुन्हा उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले असून, आरोपीला जेरबंद करून चोरी गेलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे.
चेतना कॉलनी येथील रहिवासी स्वाती बंडु देशपांडे यांच्या बंद घराचे कपाट उचकटून अज्ञात चोरट्याने सोन्याची नथ, सोन्याचा पत्ता, सोन्याचे मणी आणि रोख रक्कम असा मुद्देमाल चोरून नेला होता. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.
गुन्ह्याचा तपास सुरू असताना, प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांना गुप्त माहिती मिळाली की, ही घरफोडी आरोपी दिपक रावसाहेब चांदणे (वय ४०, रा. वडगाव गुप्ता) याने केली आहे. आरोपी गजानन कॉलनी परिसरात येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळताच तपास पथकाने सापळा रचून त्याला तात्काळ ताब्यात घेतले.
आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून, पोलिसांनी त्याच्याकडून चोरीस गेलेला संपूर्ण मुद्देमाल हस्तगत केला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राकेश खेडकर करत आहेत.
ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि हेमंत थोरात, सफौ राकेश खेडकर, संदीप ■ पान ४ वर

## रिक्षा प्रवाशांना मारहाण करून लुटणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

### कोतवाली पोलिसांची कारवाई । ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रिक्षातून प्रवास करणाऱ्या परप्रांतीय मजुरांना निर्जन स्थळी नेऊन मारहाण व दमदाटी करत जबरदस्तीने लुटणाऱ्या सराईत गुन्हेगारास कोतवाली पोलिसांनी अवघ्या दोन दिवसांत जेरबंद केले आहे. त्याच्याकडून लुटलेला मुद्देमाल आणि गुन्ह्यात वापरलेली ऑटो रिक्षा असा एकूण ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
फिर्यादी बादल भारत रामरज्जत (वय ३५, रा. केडगाव, अहिल्यानगर) हे आपल्या मित्रासह केडगाव येथे जाण्यासाठी एका रिक्षात बसले होते. दरम्यान, अज्ञात रिक्षाचालकाने रिक्षा एका निर्जन स्थळी थांबवून फिर्यादी व त्यांच्या मित्राला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी देऊन दोन ■ पान ४ वर



**पथकात यांचा सहभाग**

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या सूचनेनुसारसहाय्यक पोलीस निरीक्षक कुणाल सपकाळे, उपनिरीक्षक गणेश देशमुख, पोहेकॉ दळवी, पोहेकॉ बोरगे, पोहेकॉ दौड, पोहेकॉ साबीर शेख, पोहेकॉ राहूल शिंदे, पोहेकॉ विजय ठोंबरे, मपोहेकॉ रोहीणी दंरदले, पोकॉ शिरीष तरटे, अतुल कोतकर, अमोल गाढे, सुरज कदम, दीपक रोहोकले, सत्यजित शिंदे, रमेश शिंदे, सचिन लोळगे, संकेत धीवर, अतुल लाटे, अतुल काजळे, गंगाधर आंग्रे, किरण वडे, मपोकॉ पल्लवी रोहकले तसेच दक्षिण मोबाईल सेलचे पोकॉ राहुल गुंडू यांच्या पथकाने केली.

## “विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल!”च्या गजरात दिंडी

### समर्थ विद्या मंदिर परिसर झाला विठ्ठलमय । ‘संतपरंपरेचे संस्कार आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजली पाहिजे’– उपाध्यक्ष दीपक ओहोळ



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सांगळे गल्ली येथील श्री समर्थ विद्या मंदिर प्राथमिक शाळेत आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने पारंपरिक दिंडी सोहळ्याचे उत्साहात आयोजन करण्यात आले. टाळ–मृदंगाच्या निनादात, विठ्ठल–रुक्मिणीच्या वेशातील चिमुकल्यांच्या सहभागाने आणि “विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल!“ या अखंड नामगजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे परिसर अक्षरशः विठ्ठलमय झाला असून, उपस्थितांना जणू प्रत्यक्ष पंढरपूरच्या वारीचा अनुभव आल्याची अनुभूती मिळाली.
या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी भक्तीबरोबरच समाजप्रबोधनाचा संदेश दिला. “प्लास्टिक जाळू नका“, “प्लास्टिक वापरू नका“, “शिक्षण चांगले घ्या“, “लिहायला शिका, वाचायला शिका“, “शहर स्वच्छ–सुंदर ठेवा“, “नदी व तलावाच्या किनारी कचरा टाकू नका“, “प्लास्टिकमुक्त भारत घडवा“, “झाडे लावा, झाडे जगवा“ अशा विविध सामाजिक संदेशांचे फलक हातात घेऊन विद्यार्थ्यांनी जनजागृती केली. भक्ती आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा सुंदर संगम घडविणारी ही दिंडी नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती.
या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ हे होते. प्रमुख उपस्थितीत मुख्याध्यापक अजय महाजन यांच्यासह शिक्षक भगवान जाधव, सतीश मेढे,, संदीप गायकवाड, किशोर महाजन,संजय मंडलिक, वैशाली मगर, तिलोतमा क्षीरसागर – देशमुख, लीना बंगळ, ■ पान ४ वर

## एनसीईआरटी-सीबीएसई अभ्यासक्रमात शिवाजी महाराजांच्या इतिहासाला न्याय द्या

### खासदार नीलेश लंके यांची लोकसभेत नियम ३७७ अंतर्गत मागणी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राष्ट्रपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या इतिहासाला राष्ट्रीय शालेय अभ्यासक्रमात योग्य स्थान मिळावे आणि त्यांच्या कार्याचा सविस्तर, वस्तुनिष्ठ व गौरवशाली इतिहास एनसीईआरटी व सीबीएसईच्या पाठ्यपुस्तकांमध्ये पूर्ववत समाविष्ट करण्यात यावा, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी लोकसभेत नियम ३७७ अंतर्गत केली.
लोकसभेत मांडलेल्या निवेदनात खासदार लंके यांनी महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ तसेच एनसीईआरटी व सीबीएसईच्या अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा सविस्तर भाग वगळण्यात आल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यांच्या कार्याचा अत्यंत मर्यादित उल्लेख करण्यात आल्याने महाराष्ट्रातील जनतेमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून, विद्यार्थ्यांना इतिहासाची अपूर्ण माहिती मिळत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.
यावेळी त्यांनी सन १९९१ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांच्या कार्यकाळात महाराष्ट्र विधानमंडळाने संमत केलेल्या ठरावाचा उल्लेख केला. या ठरावानुसार छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास बदलला जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका राज्याने घेतली होती. मात्र, सध्याच्या अभ्यासक्रमातील बदल हा त्या निर्णयाच्या विरोधात असल्याचे त्यांनी नमूद केले.
खासदार लंके यांनी सांगितले की, इयत्ता चौथी ते बारावीपर्यंतच्या एनसीईआरटी व सीबीएसईच्या पाठ्यपुस्तकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा उल्लेख अत्यंत मर्यादित स्वरूपात करण्यात आला आहे. तसेच इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकातून मराठा साम्राज्याचा विस्तार दर्शविणारा नकाशा वगळण्यात आल्याचाही मुद्दा त्यांनी सभागृहात उपस्थित केला. इतिहासाचे अचूक आणि सर्वसमावेशक ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाबरोबरच त्यांचे प्रशासन, आरमार, गनिमी कावा, लोककल्याणकारी राज्यकारभार आणि सामाजिक दृष्टीकोन ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त पुतळा सुशोभीकरणाची मागणी



अहिल्यानगर- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १ ऑगस्ट रोजी होणाऱ्या जयंतीनिमित्त सिद्धार्थनगर येथील त्यांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण व परिसराची स्वच्छता करण्यात यावी, या मागणीसाठी सकल मातंग समाज, अहिल्यानगरच्या वतीने महापालिका आयुक्त, महापौर तसेच अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर यांना निवेदन देण्यात आले.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सिद्धार्थनगर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पॉलिश करून स्मारकाची रंगरंगोटी करण्यात यावी. तसेच फुलांची आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई, मंडप, स्टेज व ध्वनीक्षेपकाची व्यवस्था करण्यात यावी. जयंती सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पुतळा परिसर व आजूबाजूचा परिसर महापालिकेच्या माध्यमातून स्वच्छ करून आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी सकल मातंग समाजाचे अंकुश मोहिते, पप्पू पाटील, याकोब वडागळे, येसुदास वाघमारे, प्रल्हाद भालेराव, अनिल वाघमारे, तेजस साठे, संकेत पवार, सिद्धांत ससाणे यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### धनादेश अनादर प्रकरणात आरोपीस तीन महिन्यांची शिक्षा

अहिल्यानगर - येथील अति.मुख्य न्यायिक



दंडाधिकारी न्यायालयाने परक्राम्य संलेख अधिनियम,( १८८१) चे कलम १३८ अंतर्गत दोन्ही धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणांमध्ये आरोपी सागर शंकर पाटील (रा. मालेगाव) यास दोषी ठरवत महत्त्वपूर्ण निकाल दिला. माननीय न्यायालयाने आरोपीस तीन महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच एका प्रकरणात २,३०,०००/- व दुसऱ्या प्रकरणात २,४०,०००/- इतका दंड भरण्याचा आदेश दिला आहे. आरोपीने दंडाची रक्कम न भरल्यास प्रत्येक प्रकरणात एक महिन्यांचा अतिरिक्त साधा कारावास भोगण्याचे आदेश दिले आहेत.सदर दोन्ही प्रकरणांमध्ये फिर्यादीतर्फे ॲड. फारूक हबीब शेख (तांबोळी) व ॲड. मुजाहीद एम. पठाण यांनी प्रभावीपणे युक्तिवाद करुन फिर्यादीची बाजू मांडली. त्यांचा युक्तीवाद व सादर करण्यात आलेले पुरावे ग्राह्य धरुन न्यायालयाने आरोपीविरुद्ध दोष निश्चित करुन शिक्षा ठोठावली आहे.

# शहरात जिल्हास्तरीय 'नशा मुक्त भारत' विषयावर विविध स्पर्धांचे आयोजन

**मेरा युवा भारत व सीएसआरडी महाविद्यालयाचा उपक्रम । युवक-युवतींना सहभागी होण्याचे आवाहन; स्पर्धेत लोकगीत, नृत्य, नाटक, चित्रकला, वादविवाद, लघुपट रील, घोषवाक्यांचा समावेश**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** भारत सरकारच्या युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालयाच्या मेरा युवा भारत अहिल्यानगर व सेंटर फॉर स्टडीज इन रुरल डेव्हलपमेंट (सीएसआरडी) यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात 'युवा शक्ती, नशा मुक्त भारताची शक्ती' या संकल्पनेवर आधारित जिल्हास्तरीय विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून युवकांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जनजागृती करणे, सर्जनशीलतेला चालना देणे आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना दृढ करणे हा असून, या स्पर्धेत युवक-युवतींना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

ही स्पर्धा २९ जुलै रोजी शहरातील सेंटर फॉर स्टडीज इन रुरल डेव्हलपमेंट (सीएसआरडी) महाविद्यालय येथे होणार आहे. जिल्ह्यातील १५ ते २९ वर्षे वयोगटातील सर्व युवक-युवती या स्पर्धांमध्ये वैयक्तिक अथवा गट स्वरूपात सहभागी होता येणार आहे.

स्पर्धांमध्ये लोकगीत (संगीत), नृत्य, नुक्कड नाटक/माईम, चित्रकला, वादविवाद, लघुपट/रील, घोषवाक्य लेखन तसेच कविता/स्लॅम पोएट्री अशा विविध कला व साहित्य प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. सर्व स्पर्धांचा विषय 'नशा मुक्त भारत' हा असून युवकांनी व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश आपल्या कलाकृतीतून मांडायचा आहे.

स्पर्धेतील उत्कृष्ट विजेत्यांना अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत राज्य व राष्ट्रीय स्तरावर सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. इच्छुकांनी माय भारत या पोर्टलवर नोंदणी करून संबंधित विभाग निवडून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार अर्ज सादर करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या उपक्रमामुळे युवकांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध होणार असून समाजात व्यसनमुक्तीचा प्रभावी संदेश पोहोचण्यास मदत होणार आहे. अधिक माहितीसाठी ९४२३४७०४३७ या संपर्क क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ज्ञानबा-तुकारामच्या जयघोषाने लाल टाकी परिसर दुमदुमला!

**महाराष्ट्र बालक मंदिर शाळेची भक्तिमय दिंडी; सलग दोन दिवस चिमुकल्या वारकऱ्यांनी साकारला विठ्ठलभक्तीचा अविस्मरणीय सोहळा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त लाल टाकी येथील महाराष्ट्र बालक मंदिर शाळेत आयोजित करण्यात आलेल्या दिंडी सोहळ्याने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. ''ज्ञानबा-तुकाराम... पांडुरंग हरी... विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल'' या अखंड नामघोषाने वातावरण भारावून गेले. टाळ-मृदुंगाच्या निनादात, अभंगांच्या सुरावटीत आणि हरिनामाच्या गजरात चिमुकल्या वारकऱ्यांनी भक्ती, संस्कार आणि परंपरेचा सुंदर संगम घडवून आणला.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुनीता शेवाळे यांच्या हस्ते भगवान श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर शिस्तबद्ध पद्धतीने दिंडीला प्रारंभ झाला. दिंडीत सहभागी विद्यार्थ्यांनी ''ज्ञानबा-तुकाराम''च्या जयघोषात परिसर दुमदुमून सोडला.

दिंडीतील विद्यार्थ्यांची पारंपरिक वेशभूषा विशेष आकर्षण ठरली. मुलींनी नऊवारी साडी, डोक्यावर तुळशीचे वृंदावन, कपाळावर गंधाचा टिळा आणि पारंपरिक अलंकार परिधान करून रुक्मिणी माता व वारकरी महिलांचे रूप साकारले. तर मुलांनी डोक्यावर पांढरी वारकरी टोपी, अंगावर शुभ्र शर्ट, धोतर आणि गळ्यात तुळशीची माळ परिधान करून वारकरी संस्कृतीचे दर्शन घडविले. काही विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणीची वेशभूषा साकारून उपस्थितांची मने जिंकली.

विद्यार्थ्यांच्या मुखी अखंड हरिनाम, हातात टाळ-मृदुंग आणि अभंगांच्या गजरात शाळेच्या प्रांगणात पारंपरिक गोल रिंगण साकारण्यात आले. या रिंगणाने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधून घेतले. भक्ती, समता, संस्कार आणि वारकरी परंपरेचे प्रभावी दर्शन या उपक्रमातून घडले.

काल शाळेच्या पूर्व प्राथमिक (बालवाडी) विभागातही अत्यंत उत्साहात बालदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. आकर्षक पारंपरिक वेशभूषा परिधान केलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सुंदर रिंगण साकारत संपूर्ण परिसर दिंडीमय केला. विठ्ठल, रुक्मिणी आणि वारकरी यांच्या वेशातील बालकांच्या निरागस रूपाने उपस्थितांची मने जिंकली. हरिनामाचा गजर, टाळ-मृदुंगाचा नाद आणि भक्तिमय वातावरणामुळे बालदिंडीला विशेष रंगत आली.

# बेकायदा तलवार बाळगणारा पैठणचा युवक बिडकीन पोलिसांच्या ताब्यात




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण-** बेकायदेशीररीत्या धारदार तलवार बाळगणाऱ्या पैठण येथील एका युवकाला बिडकीन पोलिसांनी अटक केली. या प्रकरणी शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ जुलै रोजी दुपारी सुमारे ३.०५ वाजता गिधाडा (ता. पैठण) येथे कारवाईदरम्यान आरोपी अरबाज अखिल सय्यद (रा. पैठण, हल्ली मुक्काम गिधाडा) हा कोणताही परवाना नसताना धारदार तलवार बाळगताना आढळून आला. त्याच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक ४७४/२०२६ अन्वये शस्त्र अधिनियम कलम ४, २५ तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी पोलीस शिपाई पवन नारायण चव्हाण यांनी फिर्याद दिली असून, पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल कदम करीत आहेत. सपोनि निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी शरद पवार, पवन चव्हाण, दिनेश चव्हाण व चालक पोलीस हवालदार सचिन म्हस्के यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# झाडे लावा झाडे जगवा ही संस्कृती रुजविण्याची गरज - अशोक कानडे

**रामकरण सारडा च्या विद्यार्थीगृहात वृक्षारोपणाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस साजरा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** दिवसेंदिवस शहरातील वाढते प्रदूषण व जंगलतोड यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षांची हानी होत आहे.शहरातील पर्यावरण व हवेतील ऑक्सिजन चे प्रमाण वाढण्यासाठी व पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शहरात मोठ्या प्रमाणात झाडे लावण्यात यावी.यासाठी ''झाडे लावा झाडे जगवा'' ही संस्कृती रुजवण्याची गरज असल्याचे प्रतिपादन हिंदसेवा मंडळाचे माजी उपाध्यक्ष तथा श्री विशाल गणेश देवस्थानचे सचिव अशोक कानडे यांनी केले आहे.

सिव्हिल हडको येथील रामकरण सारडा विद्यार्थी गृहामध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्मदिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. याप्रसंगी रामकरण सारडा विद्यार्थी गृहाच्या परिसरात हिंदसेवा मंडळाचे माजी उपाध्यक्ष तथा शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश देवस्थानचे सचिव अशोक कानडे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी हिंद सेवा मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा,सारडा महाविद्यालयाचे जुनिअर कॉलेजचे चेअरमन मधुसूदन सारडा,दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई,भाजपाचे उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सचिन पारखी,वस्तीगृहाचे अधीक्षक बंडू भोसले आदी उपस्थित होते.

# स्व. अजित पवार जयंतीनिमित्त बुरुडगावात 'लाडक्या बहिणीं'ना साड्यांची अनोखी भेट

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर-** राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त बुरुडगाव येथे सामाजिक बांधिलकी जपत महिलांसाठी विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते संकेत कुलट आणि नवनाथ वाघ यांच्या पुढाकारातून तसेच आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली गावातील 'लाडक्या बहिणीं'ना नवीन सहावारी व नऊवारी साड्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात एक हजारांहून अधिक महिलांना साड्यांचे वितरण करण्यात आले असून, महिलांचा या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्व. अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी त्यांच्या कार्याला उजाळा देत आदरांजली वाहिली. यावेळी ''अजित पवार अमर रहे'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. महिलांनीही मोठ्या उत्साहाने कार्यक्रमात सहभाग नोंदवित उपक्रमाचे स्वागत केले.


यानंतर गावातील महिलांना नवीन सहावारी आणि नऊवारी साड्यांचे वितरण करण्यात आले. साडी स्वीकारताना अनेक महिलांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंद स्पष्टपणे दिसून येत होता. सामाजिक बांधिलकी जपत महिलांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

याप्रसंगी सोनाली कुलट, स्नेहल कुलट, मनिषा कुलट, मंगल वाघ, सुभाष कुलट, मुन्ना कुलट, विशाल पवार, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक महेंद्र हिंगे, मुख्याध्यापक मंगेश झिने, भाजप अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष अकिलभाई इनामदार, दिलीप बोठे, राधाकिसन कुलट, जालिंदर कुलट, खंडू काळे, बाळासाहेब जाधव, दिनेश शेळके, रवींद्र डमढेरे, अमित जाधव, दिलीप पाचारणे, गणेश दरंदले, भैय्या शिंदे, भैय्या साळुंके, संदीप पाचारणे, सोहेल सय्यद, जब्बार शेख, अविनाश कुलट, राजू शेख, गहिनीनाथ वाघ यांच्यासह गावातील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संकेत कुलट म्हणाले की, स्व. अजित पवार यांनी आपल्या कार्यकाळात ग्रामीण विकासाला सर्वोच्च प्राधान्य दिले. रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि पायाभूत सुविधांच्या माध्यमातून ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा दिली. त्यांचा आमदार संग्राम जगताप यांच्यावर विशेष विश्वास होता. त्या विश्वासाच्या बळावर आमदार जगताप यांनी अहिल्यानगर शहर आणि परिसरासाठी मोठ्या प्रमाणात विकासनिधी उपलब्ध करून अनेक महत्त्वाकांक्षी विकासकामे मार्गी लावली. स्व. अजित पवार यांच्या कार्यातून समाजासाठी काहीतरी देण्याची प्रेरणा आम्हाला मिळाली आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त महिलांचा सन्मान करण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला असून, भविष्यातही समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

नवनाथ वाघ म्हणाले की, स्व. अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून गावातील लाडक्या बहिणींना एक छोटीशी भेट देण्याचा आमचा प्रयत्न आहे. महिलांचा सन्मान आणि त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने साडी वाटपाचा हा उपक्रम आयोजित करण्यात आला. समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आनंद पोहोचविण्याची प्रेरणा आम्हाला दादांच्या कार्यातून मिळाली. आज एक हजारांहून अधिक महिलांनी या उपक्रमात सहभाग घेतला. त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आमच्यासाठी सर्वात मोठे समाधान आहे.

### शब्दकोडे क्रमांक : १३



**आडवे शब्द :** १. आपली मातृभाषा ३. मिळवण्याची क्रिया ५.एक म्हण- 'दुरून डोंगर *' ८. भित्रा नसलेला ९. अंगावरील बारीक केस १२. मामाची बायको १४. हिंदीत-फांदी १६. आळी १७. मृदू १९. स्वरांचा चढता क्रम २०. लग्नात पारंपरिक पद्धतीने जेवणाची पद्धत २१. बद्धकोष्ठता २३. जरासे २४. तबल्याचा साथीदार २६. आईचा भाऊ २७.एक वाहन २९. उमर ३१. मजबूत मनःस्थितीचा ३३. कष्टाचे केलेले चीज ३४.एक पालेभाजी ३५. इच्छा ३६. विविध प्रकारचे ३८. नोकरी ३९., किंमत ४०. तोफगोळा डागण्यासाठी वापरतात ४१.रात्री रस्ता भटकणे ४३. छंद ४४. शाळेत विद्यार्थी ज्यावर लिहितात ते ४५. चार युगांपैकी एक ४८.एक लोकनृत्य ५१.एक थोर भारतीय शास्त्रज्ञ ' अब्दुल * * * ' ५२. खोटा दम ५३. हुलकावणी ५३. साहेब **उभे शब्द :** १. मत देण्याचा अधिकार २.अयोध्यापती ३. टापू ४. पाणी ६. दुनिया ८. मंद २०. '** पाव' एक खाद्य ११. वेळ १२. बाब १३.मज्जाव १५. छुपाछुपी १६. वातकरी १८. लीन १९. आळ २२. प्रधान ३५. ग्राम ३६. वानर २८. देवाची केलेली आवळणी ३९. एक नदी ३२. एक धरण ३३. मुकाबला ३६. नाव ३७. स्वच्छ ३८. गाडीचे पाय ३९. नवरा ४०. सोने मोजण्याचे एक प्रमाण ४१. सजीव ४२. वात ४४. कंगवा ४६. अंधार ४७.एक धान्य ४९. उणे ५०. हिंदीत - पाया

**शब्दकोडे क्रमांक : १२ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| गु | ज | रा | त | | भा | र | त | | ना | ई | ल |
| ग | | डा | | धा | गा | | ग | ट | | म | ग |
| ल | ता | | घी | | का | ळा | | क | वा | ली | |
| | व | ग | | ता | र | | स | | टी | | ली |
| वा | | त | ड | क | | म | हा | ल | | खु | ला |
| स | र | का | र | | न | ख | रा | | मा | | व |
| रू | | ळ | | घा | ग | र | | घा | य | ल | |
| | गु | | मी | | र | | आ | व | | व | टी |
| बा | रू | द | | शि | | का | म | | चा | क | |
| प | | गा | व | रा | न | | र | सा | | र | ग |
| | ग | बा | न | | र | म | ण | | दे | | ग |
| ग | र | ज | | का | क | ण | | सा | व | धा | न |

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अहिल्यानगर येथील ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षाचा २६ जुलै रोजी शुभारंभ!


अहिल्यानगरः ''ज्ञानं यस्य बलं तस्य'' या प्रेरणादायी ब्रीदवाक्याला जीवनमंत्र मानून शिक्षण क्षेत्रात अविरत कार्यरत असणाऱ्या येथील नामांकित ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्य महोत्सवी (२५ व्या) वर्षाचा भव्य शुभारंभ येत्या रविवार, दिनांक २६ जुलै २०२६ रोजी होत आहे. या सुवर्णक्षणाचे औचित्य साधून गुरु-शिष्य परंपरा या संकल्पनेवर आधारित एका भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शाळा प्रशासनाने दिली आहे. गेल्या २५ वर्षांपासून ज्ञानसंपदा शाळेने हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनाला ज्ञान, शिस्त, सर्जनशीलता, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रप्रेमाची दिशा देत त्यांचे भविष्य उज्वल केले आहे. आधुनिक शिक्षणासोबत भारतीय संस्कृती, नैतिक मूल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकासाचा उत्तम समन्वय साधत शाळेने शिक्षण क्षेत्रात आपला एक वेगळा ठसा उमटविला आहे. वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजनःहा केवळ एक उत्सव नसून ज्ञान आणि गुणवत्तेच्या परंपरेचा गौरव सोहळा आहे. हा केवळ एक उत्सव नसून ज्ञान आणि गुणवत्तेच्या परंपरेचा गौरव सोहळा आहे. या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त वर्षभर विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी आणि समाजबांधव यांच्या सक्रिय सहभागातून अनेक उपक्रम राबविले जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने शिक्षण परिषद, व्याख्यानमाला यांसारख्या शैक्षणिक व बौद्धिक उपक्रमांचा समावेश असेल. तसेच क्रीडा व आरोग्यासाठी मॅरेथॉन स्पर्धा, पर्यावरण संवर्धनासाठी ज्ञानसंपदा स्मृतीवन हा विशेष पर्यावरणपूरक प्रकल्प राबविण्यात येणार आहेत.

### सुनीता लोंढे यांची संशोधनातून मानाची झेप

अहिल्यानगर - अनुकूल कम्प्युटरच्या संचालिका तथा शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या सुनीता मुकुंद लोंढे यांनी मराठी साहित्य संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवी प्राप्त केली आहे. विद्यापीठाकडून पदवी जाहीर झाल्याचे अधिकृत पत्र नुकतेच त्यांना प्राप्त झाले असून, त्यांच्या या यशामुळे शैक्षणिक, साहित्यिक आणि सामाजिक क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.
सुनीता लोंढे यांनी अहिल्यानगर येथील पेमराज सारडा महाविद्यालयाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. माहेश्वरी वीरसिंग गावीत यांच्या मार्गदर्शनाखाली गुलबर्गा (कर्नाटक) येथील अनुबंध नियतकालिकातील कथांचा विवेचक अभ्यास या विषयावर संशोधन प्रबंध सादर केला. मराठी साहित्याच्या अभ्यासात महत्त्वाचे स्थान असलेल्या या संशोधनातून अनुबंध नियतकालिकात प्रकाशित कथांमधील आशय, कथनशैली, साहित्यिक मूल्ये, सामाजिक वास्तव, मानवी संवेदना आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब यांचा चिकित्सक व सखोल अभ्यास करण्यात आला आहे. या संशोधनामुळे मराठी कथासाहित्यातील एका महत्त्वपूर्ण नियतकालिकाच्या साहित्यिक योगदानाचे शास्त्रीय मूल्यमापन होण्यास मदत झाली असून, संशोधन क्षेत्रात हा अभ्यास उपयुक्त संदर्भग्रंथ ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. साहित्य अभ्यासक, संशोधक आणि विद्यार्थ्यांसाठीही हे संशोधन दिशादर्शक ठरणार असल्याचे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे.

### ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व निवृत्त प्राचार्य शरदराव माणकेश्वर यांचे निधन

अहिल्यानगर - शहरातील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, निवृत्त



प्राचार्य तथा अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या विविध शैक्षणिक संस्थांमध्ये दीर्घकाळ सेवा बजावलेले शरदराव दत्तात्रय माणकेश्वर यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने नगरच्या शैक्षणिक क्षेत्रावर शोककळा पसरली असून, शिक्षण क्षेत्रातील एक अभ्यासू, कर्तव्यदक्ष आणि विद्यार्थीप्रिय व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना विविध मान्यवरांनी व्यक्त केली. शरदराव माणकेश्वर यांनी सन १९६० मध्ये अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये नॉन-टीचिंग स्टाफ म्हणून आपल्या सेवेला प्रारंभ केला. प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची ओढ कायम ठेवत त्यांनी बाह्य शिक्षणाद्वारे स्वतःचे उच्च शिक्षण पूर्ण केले. आपल्या मेहनत, जिद्द आणि गुणवत्तेच्या बळावर त्यांनी संस्थेतील विविध पदांवर जबाबदाऱ्या सांभाळल्या. शिक्षण क्षेत्रातील प्रामाणिक कार्याची दखल घेत त्यांची पुढे बी.एड. महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी नियुक्ती झाली. आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात त्यांनी शैक्षणिक गुणवत्ता, शिस्त आणि विद्यार्थीकेंद्री शिक्षणपद्धतीचा सातत्याने पुरस्कार केला. इंग्रजी विषयावर त्यांचे विशेष प्रभुत्व होते.

# यंदाच्या शैक्षणिक वर्षातही विद्यार्थी कला शिक्षणास मुकणार; अभियोग्यता धारकांचा उपोषणाचा इशारा

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाकडून राज्यात मोठी शिक्षक भरती होत असून यात कला शिक्षकांच्या अतिशय तुटपुंज्या जागा भरल्या जाणार असल्याने कला शिक्षक अभियोग्यता धारकांनी तीव्र संताप व्यक्त करत आमरण उपोषण आंदोलनाचा इशारा दिला आहे. राज्यात पवित्र पोर्टल मार्फत जवळपास १८ हजारापेक्षा अधिक शिक्षकांची भरती होणार आहे. मात्र अर्थसंकल्पीय तसेच पावसाळी अधिवेशनात शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांनी वारंवार कला शिक्षक भरती करू असे सांगितले असतांना, अगदी बोटावर मोजण्या एवढ्याच कला शिक्षकांच्या जागाची पवित्र पोर्टलवर नोंद झाल्याची माहिती आहे.

खरतर शालेय शिक्षणात चित्रकला, हस्तकला आणि सर्जनशील कौशल्यांचा विकास करण्यासाठी कला विषय महत्त्वाचा मानला जातो. मात्र कला शिक्षकांची नियुक्ती होणार नसल्याने विद्यार्थ्यांना या विषयाचे दर्जेदार शिक्षण मिळणे कठीण होणार असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

महाराष्ट्र शासनाच्या १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार कला विषयाचे पद हे आधार वैध असणाऱ्या ५०१ विद्यार्थी संख्या असलेल्या शाळेत भरले जाईल असे स्पष्ट केले असताना राज्यातील बहुतांश शैक्षणिक संस्थानी पवित्र पोर्टलवर या जागा दिल्या नाहीत. शैक्षणिक संस्थाच्या संचमान्यत्यानुसार बहुतांश शाळेत कलाशिक्षक पद बसत असतांनी केवळ शैक्षणिक संस्थांच्या मुजोर कारभारामुळे आणि शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे विद्यार्थ्यांना कला शिक्षक मिळणार नाही.

एकीकडे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण –२०२० अंतर्गत कला– कार्यानुभव या विषयांना खूप प्राधान्य दिले आहे.तसेच महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादासाहेब भुसे यांनी देखील अर्थसंकल्पीय अधिवेशन तसेच पावसाळी अधिवेशनात असंख्य वेळा कला–कार्यानुभव पदे शाळांमध्ये भरून विद्यार्थ्यांना दर्जे दार कला शिक्षण मिळणार आहे असे ही स्पष्ट केले आहे. परंतु अनेक संस्था शाळा व आस्थापनांनी संच मान्यतेमध्ये कलेचे पद बसत असूनही, मनमानी कारभार करत शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून जाणीवपूर्वक कला विषयाचे शिक्षक पद भरण्याबाबत उदासीनता दाखवली आहे. वास्तविक २०१२ पासून आजतागायत कला शिक्षक भरती झालेली नाही. यावर्षी, महाराष्ट्र राज्य कलाध्यापक संघ, जिल्हा शाखा पुणे या कला संघटनेच्यावतीने अनेक वेळा कला शिक्षक भरतीबाबत राज्याचे शिक्षण मंत्री, राज्यातील शिक्षक आमदार, खासदार,शिक्षण विभागातील अधिकारी यांना निवेदने दिली. मुंबईच्या आझाद मैदानावर तब्बल सहा दिवस राज्यव्यापी आंदोलन देखील केले. मात्र शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी शैक्षणिक संस्थांवर कोणताही अंकुश ठेवला नाही, शैक्षणिक संस्थांना कलेच्या जागा पवित्र पोर्टलवर नोंद करण्याबाबत निर्देशित केले नाही. त्यामुळे शैक्षणिक संस्थानी मनमानी करत कला शिक्षक पदे पवित्र पोर्टलवर नोंदवले नाही. एकीकडे शासन शासकीय रेखकला परीक्षेच्या माध्यमातून दहावी बोर्डाच्या परीक्षेमध्ये अ श्रेणीसाठी –७ गुण, ब श्रेणीसाठी –५ गुण, व क श्रेणीसाठी–३ गुण असे वाढीव गुण देत आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणांची टक्केवारी ही वाढत आहे. तर दुसरीकडे कला शिक्षक भरती करताना शासन–प्रशासन उदासीनता दाखवत आहे.त्यामुळेच विद्यार्थ्यांना कला शिक्षणापासून वंचीत राहावे लागणार आहे.

# अनाहत एक कलासृष्टीच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त 'अभंगनाद'चे आयोजन

## अभंग, भक्तीगीत,गजर, दिंडी,नृत्य यांचे होणार सादरीकरण

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथील अनाहत एक कलासृष्टी संस्थेच्या वतीने आषाढी एकादशी निमित्त ''अभंगनाद '' या अभंग आणि भक्ती गीतांच्या विशेष कार्यक्रमाचे आयोजन आषाढी एकादशीच्या दिवशी दि.२५ जुलै २०२६ रोजी सायं. ६ ते ९ या वेळेत माऊली सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे करण्यात आले आहे.या कार्यक्रमात अहिल्यानगर येथील प्रथितयश कलाकार सहभागी होणार आहेत. कार्यक्रमाची संकल्पना आणि दिग्दर्शन अखिल भारतीय नाट्य परिषदेचे उपनगर शाखेचे अध्यक्ष प्रा. प्रसाद बेडेकर यांचे असून सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक श्री. अभिजित अपस्तंभ, श्री. ओंकार देऊळगावकर तसेच सुप्रसिद्ध गायिका सौ. अनुजा कुलकर्णी,सौ. अमृता बेडेकर, सौ. श्रेया सुवर्णपाठकी हे कलाकार आपली गायन सेवा सादर करणार असून त्यांना संवादिनी वर श्री. संकेत सुवर्णपाठकी तर तबल्यावर प्रसाद सुवर्णपाठकी, ॲड. आनंद कुलकर्णी,पखवाजावर सौरभ साठे, तालवाद्यावर शार्दूल खोल्लम हे साथसंगत करणार आहेत. या कार्यक्रमात लोकप्रिय अभंग व भक्तीगीत,गजर, दिंडी याबरोबरच अभंग नृत्य यांचे सादरीकरण कु. वैष्णवी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सादर होणार आहे. तसेच यामध्ये नगर मधील विविध संगीत विद्यालयातील कला साधक आणि अनाहतचे सदस्य सहभागी होणार आहेत.या कार्यक्रमास , सेंट्रल बँक ऑफ इंडिया, चंदूकाका सराफ, नगर स्टोरीज, रेडिओ सिटी यांचे सहकार्य लाभले आहे.हा कार्यक्रम विनामूल्य असून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य असून जास्तीत रसिकांनी रसिकांनी या मैफलीचा आस्वाद घ्यावा असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रसाद सुवर्णपाठकी व श्री.संदिप कुलकर्णी यांनी केले आहे.

# डॉ.पाऊलबुधे तंत्रनिकेतन मध्ये कॅम्पस मुलाखती,विद्यार्थ्यांना नामांकित कंपनीत नोकरी

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** नगर – सोलापूर रोडवरील नारायण डोह येथील डॉ.एन.जे.पाऊलबुधे तंत्रनिकेतन कॉलेजमध्ये कॅम्पस मुलाखती मधून विद्यार्थ्यांना अहिल्यानगर येथील नामांकित कंपनीत नोकरीसाठी निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाद्वारे एप्रिल – मे २६ मध्ये घेण्यात आलेल्या पदविका परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये अंतिम वर्ष मेकॅनिकल इंजिनिअरिंगला पास झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आले. अहिल्यानगर येथील कायनेटिक इंजिनिअरिंग व एमआयडीसी मधील सिद्धी फोर्जिंग कंपनीच्या प्रतिनिधींनी मुलाखती घेऊन विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार नोकरी देण्याचे जाहीर केले.

या मुलाखतीमध्ये कायनेटिक चे एच.आर. श्री. सुनील मंडलिक, रिक्रुटमेंट ऑफिसर कृष्णा माकोणे टी. एस.पी.एल.चे मॅनेजर सचिन पंडित, एच.चार.श्री.अनिकेत भिंगारदिवे सिद्धी फोर्जिंग चे एच.आर.श्री.माधव बोचरे आदींनी विद्यार्थ्यांना त्यांच्या अनुभवा बाबत प्रश्न विचारून आवडीनुसार काम करण्याचे क्षेत्र निवड करण्याचे स्वातंत्र्य दिल्याने अनेक विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली. याबद्दल कॉलेजचे प्राचार्य बाळासाहेब बोर्डे यांनी कंपनीचे व्यवस्थापन या सर्वांचे आभार मानले.कॅम्पस मुलाखती घेण्यासाठी उपप्राचार्य रवींद्र देशपांडे, प्लेसमेंट प्रमुख विश्वनाथ आदवडे, मेकॅनिकल विभाग प्रमुख जाबीर अली, अकॅडमीक प्रमुख जयश्री होले आदींनी परिश्रम घेतले. अहिल्यानगर येथील नामांकित कंपनीमध्ये निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे सेवा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे, संचालक साई पाऊलबुधे, प्राचार्य बाळासाहेब बोर्डे, तंत्रनिकेतनचे सर्व विभाग प्रमुख, अध्यापक यांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# कामगारांच्या मुलांची शिष्यवृत्ती बंद केल्याच्या निषेधार्थ ३ ऑगस्टला अहिल्यानगरमध्ये आंदोलन

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राज्यातील बांधकाम व इतर कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांमध्ये करण्यात आलेल्या बदलांमुळे कामगारांवर मोठा अन्याय होत असल्याचा आरोप लोकशाही बांधकाम कामगार व इतर कामगार संघटना (महाराष्ट्र राज्य) यांनी केला आहे. विशेषतः कामगारांच्या मुलांसाठी देण्यात येणारी शैक्षणिक शिष्यवृत्ती बंद करण्यात आल्याने हजारो विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर गंभीर परिणाम होणार असल्याचा दावा संघटनेने केला आहे. या निर्णयाच्या निषेधार्थ येत्या ३ ऑगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कामगारमंत्री आकाश पुंडकर यांच्या पुतळ्याचे दहन करण्यात येणार असल्याचा इशारा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शंकरराव भैलुमे यांनी दिला.

यासंदर्भात संघटनेच्या वतीने सहाय्यक कामगार आयुक्त तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राज्य सरकारला निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात कामगारांच्या हिताच्या योजनांमध्ये करण्यात आलेले बदल तातडीने मागे घेऊन पूर्वीप्रमाणे सर्व योजना सुरू ठेवाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, बांधकाम कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी मिळणारी शिष्यवृत्ती बंद झाल्यामुळे अनेक गरीब आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवर मोठा आर्थिक भार पडणार आहे. शिक्षणासाठी लागणारा खर्च उचलणे अनेक कामगारांना शक्य होणार नसल्याने विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे हा निर्णय कामगारांच्या मुलांच्या भवितव्याशी खेळणारा असून तातडीने रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

## भोयरे गांगर्डा येथील नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

# भाजप ओबीसी मोर्चा व भोयरे गांगर्डा ग्रामपंचायतीचा पुढाकार



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा आणि ग्रामपंचायत भोयरे गांगर्डा यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण नागरिकांसाठी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त घेण्यात आलेल्या या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा सहज उपलब्ध व्हाव्यात, विविध आजारांचे वेळेत निदान व्हावे आणि आरोग्याबाबत जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने भोयरे गांगर्डा (ता. पारनेर) येथे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

हा उपक्रम पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजप प्रदेश उपाध्यक्ष सुजय विखे पाटील, पारनेर तालुका अध्यक्ष राहुल शिंदे तसेच दत्ता नाना पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी सरपंच संतोष केकडे, उपसरपंच आदिनाथ गायकवाड, भाजप ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर, राहुल दादा शिंदे, दत्ता नाना पवार, मनोज मुंगसे, लहु भालेकर, माजी सरपंच भाऊसाहेब भोगडे, माजी उपसरपंच दौलतराव गांगड, किशोर रसाळ, मेजर नाना केकडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष युवराज पाटील डोंगरे, सेवा सोसायटी संचालक माणिक पवार, व्हाईस चेअरमन सचिन रसाळ, उद्योजक अक्षय भोगाडे, अक्षय गरदारे, दादासाहेब जवक, गणेश गायकवाड, राजेंद्र गांगड, मेजर प्रमोद रसाळ, विवेक गायकवाड, शेखर पवार, तात्यासाहेब रसाळ, माजी चेअरमन अशोक पवार, संचालक शिवाजी रसाळ यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिरामध्ये नागरिकांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब, मधुमेह, विविध आजारांचे प्राथमिक निदान तसेच आवश्यक वैद्यकीय सल्ला देण्यात आला. अनेक नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेत आरोग्य तपासणी करून घेतली.

# स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त अरुणोदय गोशाळेत चाऱ्याचे वाटप

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ओबीसी सेलच्या वतीने समाजोपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. शहरातील अरुणोदय गोशाळेत सात दिवस पुरेल इतक्या चाऱ्याचे वाटप करून गोसेवेचा संदेश देण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत पशुसंवर्धनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

स्व. अजित पवार यांच्या कार्यातून प्रेरणा घेत समाजहिताला प्राधान्य देणारे उपक्रम सातत्याने राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. गोमातेची सेवा ही भारतीय संस्कृतीतील महत्त्वाची परंपरा असून गोशाळांच्या माध्यमातून निराधार जनावरांचे संगोपन करणाऱ्या संस्थांना समाजाने सहकार्य करणे ही काळाची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या उपक्रमामुळे गोशाळेला सात दिवस पुरेल इतका चारा उपलब्ध झाला असून गोसेवेच्या कार्याला हातभार लागला आहे.

कार्यक्रमाप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे शहर जिल्हाध्यक्ष दीपक खेडकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी शहर जिल्हाध्यक्ष प्रा. माणिक विधाते, शहर जिल्हा कार्याध्यक्ष (ओबीसी) नितीन घोडके, शहर जिल्हा उपाध्यक्ष किरण मेहेत्रे, संतोष हजारे, किरण जावळे, विक्रम बोरुडे, महेश सुडके, महेश गाडे, आशिष भगत, विश्वास शिंदे, संकेत लोंढे, वैभव नेमाने, शैलेश सत्रे, सुजल झुंजारे, सुनील शिंदे, निखिल ताठे, गणेश शेलार, प्रसाद भडके यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि गोसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दीपक खेडकर म्हणाले की, स्व. अजित पवार यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिले. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन समाजोपयोगी उपक्रम राबविणे हीच त्यांना खरी आदरांजली आहे.

# विठ्ठलनामाच्या गजरात केडगावच्या सरस्वती विद्यालयात रंगली पंढरीची वारी

## महाराष्ट्राची संतपरंपरा, संस्कृती आणि सामाजिक मूल्ये नव्या पिढीत रुजावी –भोर | ७०० विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर केडगाव येथील सरस्वती प्राथमिक विद्या मंदिरात विठ्ठलनामाच्या अखंड गजरात, टाळ–मृदंगाच्या निनादात आणि भक्तीमय वातावरणात 'पंढरीची वारी, वृक्षदिंडी आणि शिक्षणाची वारी' हा आगळावेगळा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. बालवाडी ते दहावीपर्यंतच्या सुमारे ७०० विद्यार्थ्यांनी वारकरी बनत महाराष्ट्राच्या संतपरंपरेचा, संस्कारांचा आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविला.

विठ्ठल–रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, मुक्ताबाई, प्रभू श्रीराम, सीता, लक्ष्मण तसेच विविध संतांच्या वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. डोक्यावर तुळशी वृंदावन, हातात विणा, मुखी विठ्ठलनाम आणि पावलोपावली हरिनामाचा गजर अशा भक्तिरसात न्हालेल्या दिंडीने परिसर भक्तिमय बनला होता.

दिंडीतून ''झाडे लावा–झाडे जगवा,एक बाळ–एक झाड,पंढरीची वारी, वृक्षदिंडी आणि शिक्षणाची वारी अशा घोषणांद्वारे पर्यावरण संरक्षण, संस्कार आणि शिक्षणाचा प्रभावी संदेश देण्यात आला. नागरिकांनी ठिकठिकाणी दिंडीचे पुष्पवृष्टी करून उत्स्फूर्त स्वागत केले.



सरस्वती विद्यालयातून निघालेली ही दिंडी मोहिनीनगर मार्गे केडगाव देवी प्रांगणात पोहोचली. तेथे विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांनी फुगडीचा आनंद लुटला. विद्यार्थ्यांनी आकर्षक रिंगण साकारत पर्यावरण संवर्धनाची गीते सादर केली. भक्ती आणि संस्कारांचा संगम अनुभवत परिसर विठ्ठलमय झाला.

यावेळी मुख्याध्यापक संदीप भोर म्हणाले, महाराष्ट्राची संतपरंपरा, संस्कृती आणि सामाजिक मूल्ये नव्या पिढीत रुजावीत, या हेतूने दरवर्षी या दिंडीचे आयोजन केले जाते. शाळा कोणत्याही माध्यमाची असो, विद्यार्थ्यांना संस्कारांचे बाळकडू देणे ही प्रत्येक शैक्षणिक संस्थेची जबाबदारी आहे. सरस्वती विद्यालयात गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच भारतीय संस्कृतीची जपणूकही केली जाते.नगरसेवक मनोज कोतकर यांनी सांगितले की, शिक्षणासोबत संस्कार, पर्यावरण संवर्धन आणि वारकरी परंपरेचे जतन करणारा हा उपक्रम समाजासाठी आदर्श आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि भारतीय संस्कृतीबद्दल अभिमान निर्माण होतो.

नगरसेवक मयूर बांगरे म्हणाले की, आजच्या आधुनिक युगात विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृतीशी जोडून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. पंढरीची वारी, वृक्षदिंडी आणि शिक्षणाची वारी यांचा सुंदर संगम घडवून सरस्वती विद्यालयाने इतर शाळांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

दिंडीचा समारोप केडगाव देवी प्रांगणात भक्तीपूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात झाला. समारोपानंतर विद्यार्थ्यांनी 'स्वच्छता हीच सेवा' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत परिसरात स्वच्छता मोहीम राबविली. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. विठ्ठलभक्ती, संतसंस्कार, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देणाऱ्या या आगळ्यावेगळ्या दिंडी सोहळ्याने उपस्थितांच्या मनात भक्तीचा, संस्कारांचा आणि समाजसेवेचा दीप प्रज्वलित केला. या दिंडी सोहळ्याप्रसंगी नगरसेवक मनोज कोतकर, नगरसेवक मयूर बांगरे, नगरसेविका कमलताई कोतकर, उद्योजक जालिंदर कोतकर, माजी नगरसेवक संभाजी पवार, प्रा.डॉ. रविंद्र चोभे, सहकार्यवाह डॉ. हेडगेवार शिक्षण प्रतिष्ठान मा. प्रा डॉ दादासाहेब काजळे, अवि साठे, सुमन पाटील, सुमन कदम, सुमन गावडे, लंका आव्हाड, प्रियंका सातपुते, किसनाबाई बनकर, जयश्री काळे, यमुना अंकुश कोल्हे, रोहिणी राऊत, रोहिणी कांबळे आदींसह शिक्षक पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर शाळेची बाल वारकरी दिंडी उत्साहात

## महाराष्ट्रात महान दिंडी परंपरेचे दर्शन– प्रकाश पोखरणा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संत परंपरेतून पंढरपूरच्या श्री विठ्ठलाची पायी दिंडी सोहळा मोठ्या उत्साहाने दरवर्षी पार पडत असतो. त्याचाच एक भाग म्हणून प्रत्येक शाळेतून बाल वारकरी दिंडी चे आयोजन करण्यात येते. दिंडीची महान परंपरा विद्यार्थ्यांना माहिती होणे आवश्यक आहे.या शाळेतील मुलांनी संत ज्ञानोबा,तुकोबा,विठ्ठल रखुमाई आकर्षक अशा वेशभूषा विद्यार्थ्यांनी केलेल्या होत्या.आषाढी एकादशी निमित्त महाराष्ट्रात महान दिंडी परंपरेचे दर्शन होते. असे प्रतिपादन श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्यालयाचे चेअरमन प्रकाश पोखरणा यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळ संचलित श्रीमती पार्वतीबाई डहाणूकर कन्या विद्या मंदिराच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त शहरातून बाल वारकरी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या दिंडीमध्ये श्री विठ्ठल रुक्मिणी यांच्या पालखीचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी हिंदसेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अजित बोरा, शाळेचे चेअरमन प्रकाश पोखरणा,शालेय समिती सदस्य अशोक कानडे,शालेय समिती सदस्या श्रीमती सुशीला मोडक,सौ.सुलभाताई कुलकर्णी,मुख्याध्यापिका सौ.रोहिणी फळे,बी.यु. कुलकर्णी,बबन धनवडे, नितीन केने,वृषाल एकबोटे, सुखदेव नागरे आदींसह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

अशोक कानडे म्हणाले,सर्वत्र पायी दिंड्या पंढरपूर येथे जात असल्याने भक्तीपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे. लहान, मोठा असा कोणताही भेदभाव न करता वारकरी पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करीत आहेत. सर्वत्र भक्तिमय वातावरण असल्याने सर्वत्र विठुरायाच्या नामाचा गजर होत आहे. शालेय दिंडीत छोट्या बालकांनी ज्ञानोबा, तुकोबा,विठ्ठल,रखुमाई, वारकरी अशा सुंदर वेशभूषा केलेली आहे.

शाळेतील पालखी सोहळा चितळे रोड,नेता सुभाष चौक, नवी पेठ, लक्ष्मी कारंजा या ठिकाणाहून दिंडीची मिरवणूक काढण्यात आली. नवी पेठ येथे शहर सहकारी बँकेच्या वतीने माजी चेअरमन अशोक कानडे तसेच बँकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी दिंडीचे स्वागत केले. यावेळी शाळेतील मुलींनी भारुड,लेझीम पथक सादर केले.दिंडीचा समारोप पसायदानाने करण्यात आला.

सूत्रसंचालन बबन धनवडे यांनी केले. प्रास्ताविक सुखदेव नागरे यांनी केले.तर आभार नितीन केने यांनी मानले.

### नाशिकहून ५६ हजार क्युसेक पाण्याची आवक

# आजपासून नाथसागरच्या पाणीपातळीत वाढ अपेक्षित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नाशिक जिल्ह्यातील धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे गोदावरी खोऱ्यातील विविध धरणांतून सुमारे ५६ हजार क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. हे पाणी आज संध्याकाळपासून टप्प्याटप्प्याने जायकवाडी (नाथसागर) धरणात दाखल होण्यास सुरुवात होणार असून, धरणाच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे.

नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील धरणांमधून सोडण्यात आलेले पाणी नांदूर-मध्यमेश्वर बंधाऱ्यामार्गे जायकवाडीच्या दिशेने प्रवाहित होत आहे. त्यामुळे आज संध्याकाळपासून नाथसागर धरणातील जलसाठ्यात वाढ होण्याची चिन्हे आहेत. पुढील २४ तासांत पाण्याची आवक कायम राहिल्यास धरणातील जलसाठ्यात मोठी



भर पडण्याची शक्यता जलसंपदा विभागाने व्यक्त केली आहे.

गेल्या काही दिवसांपासून मराठवाड्यातील नागरिक आणि शेतकऱ्यांचे लक्ष जायकवाडीच्या जलसाठ्याकडे लागले होते. नव्याने होणाऱ्या पाण्याच्या आवकेमुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटण्याबरोबरच सिंचनासाठीही दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

दरम्यान, जायकवाडी धरण परिसरातील परिस्थितीवर प्रशासनाकडून बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून, गोदावरी नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहून प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास नाथसागरच्या पाणीपातळीत आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# विद्यार्थ्यांमध्ये संत परंपरा आणि शिस्त व संस्कार रुजवणे गरजेचे– सिताराम खिलारी

## ढोकेश्वर विद्यालयात दिंडी सोहळा उत्साहात



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**टाकळी ढोकेश्वर–** टाकळी ढोकेश्वर विद्यालयाने गावातून दिंडी व पालखी मिरवणूकीचे आयोजन करणे या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संत परंपरेचा वारसा, भक्ती, संस्कार, शिस्त, समता, आणि सामाजिक ऐक्याची भावना रुजवणे हा आहे.

पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील ढोकेश्वर विद्यालयाने शनिवारी होणाऱ्या आषाढी एकादशीच्या निमित्ताने भव्य दिंडी सोहळा व पालखी मिरवणूक गावातून काढली होती त्यावेळी बाजारतळावर मार्गदर्शन करताना संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी बोलत होते.

ते पुढे बोलताना म्हणाले की शिक्षणाबरोबरच संस्कारही तितकेच महत्वाचे आहेत. संतांच्या विचारांचा आदर्श विद्यार्थीनी आपल्या जीवनात घ्यावा आणि देशाचे चांगले नागरिक घडावे. पंढरीच्या विठ्ठल कृपेने राज्यात सर्वत्र चांगले पर्जन्य व्हावे. अशीही प्रार्थना अण्णांनी यावेळी केली.

सुरुवातीला विद्यालयात पारनेर तालुका खरेदी विक्री संघाचे माजी अध्यक्ष सन्मा. बाबाशेठ खिलारी तथा नाना, प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, सर्व शिक्षक व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तिचे पूजन करण्यात आले. गणपती व विठ्ठलाची आरती घेऊन दिंडी व पालखीचे विठ्ठल नामाच्या जयघोषात गावात प्रस्थान झाले. विद्यार्थी टाळ, मृदूंगासह वेशभूषा करून आले होते. विठ्ठल-रुक्मिणी यांची पात्र, विराज बांडे व पूर्वा शिंदे यांनी आणि ज्ञानदेव, मुक्ताबाई, तुकाराम यांची पात्र रोनित कटारिया, भक्ती खैरे व माऊली उदावंत या विद्यार्थांनी केले होते.

विठ्ठल विठ्ठल विठ्ठला हरी ओम विठ्ठला व माऊली-माऊली या गीतावर विद्यार्थ्यांनी गोल रिंगण धरले. नंतर पालखी व दिंडी विद्यालयातून गावातील वेशीपर्यंत व पुढे पारनेर रस्त्याला असणाऱ्या विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी पोहोचली. तेथून विद्यालयात आल्यावर समारोप झाला. पालखी मार्गावर सरपंच बाळासाहेब खिलारी, किरण झावरे, लक्ष्मण झावरे, अशोक वाळुंज, अनिल निवडुंगे, प्रशांत तराळ, पत्रकार संजय मोरे, भानुदास खिलारी, संपतशेठ तराळ, सुभाष खिलारी यांनी पूजन करून दर्शन घेतले.

हा दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्वच सेवकांनी परिश्रम घेतले. यावेळी अतुल सैद, प्रिया डव्हणे, कल्पना जाधव, सुरेखा ठाणगे, वैशाली गायखे, बाबासाहेब जाधव, निलेश जासूद, निलम खिलारी, संदिप महांडुळे, संदिप खिलारी, अशोक गांगड, नितीन ढोकळे, भाऊसाहेब हिंगडे, नारायण शेळके, सोनल रोहकले, सुमन वाळुंज, वर्षा भोंडवे, विष्णू भद्रे, सोनाली माळवदे, मिनाक्षी पवार, पवन कुटे, अनुष्का कांबळे, नारायण हरेल, अमोल गोरे, सुनिता घोडके इत्यादी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### श्री कपारीचा विठ्ठल मंदिर नांदूर

# धाकटी पंढरी.. म्हणून संबोधले जाते नांदूर विठ्ठलाचे गाव



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर पासून अवघ्या ३० किलोमीटर अंतरावर नांदूर विठ्ठलाचे या गावची.. आषाढी महा एकादशी यात्रा शनिवार दिनांक २५ जुलै २०२६ रोजी भरत आहे. वेगवेगळ्या गावातून, वेगवेगळे विभागातून, अनेक पालख्या ,नांदूर विठ्ठलाचे या गावी येत असतात. आलेल्या भक्तांची, दिंड्यांची व्यवस्था नांदूर मंदिर ट्रस्ट तर्फे सु व्यवस्थित नियोजन केले गेले आहे .अशी माहिती देवस्थानचे प्रमुख माननीय एकनाथ विधाते व प्राध्यापक कारभारी विधाते यांनी दिली.

हातावरच्या संख्येने अनेक भक्तगण या गावी आषाढी एकादशी दिवशी येत असतात. येथील विठ्ठलाची मूर्ती डोंगराच्या कपारीत स्वयंभू अवस्थेत तयार झालेली आहे. नांदूर विठ्ठलाचे या गावला धाकटी पंढरी असे म्हटले जाते. देवस्थान तर्फे फराळ खिचडी वाटप आलेल्या भक्तगणांकरता गावकऱ्यांतर्फे दिले जाते. गर्दीचे सुनियोजित व्यवस्था विश्वस्तांच्या सर्वांच्या सहकाऱ्यांनी पार पाडले जाते. मंदिरापासून काही अंतरावर गाड्यांची पार्किंग व्यवस्था करण्यात आलेली आहे. काल्याचे कीर्तन श्री रिंगणे देवा हे करणार आहेत. तरी सर्व विठ्ठल भक्तांनी नांदूर विठ्ठलाचे या गावी दर्शनासाठी यावे असे आवाहन करण्यात येत आहे. ज्या लोकांना फक्त गणांना पंढरपूरला वेळेअभावी कामाच्या कारण परत वेळ जाता आले नाही असे हजारो भक्तगण , आषाढी महा एकादशीला येत असतात.

हे मंदिर अहिल्यानगर जामखेड रोडवर आठवणच्या पुढे.. पाच किलोमीटर वरती.. नांदूर विठ्ठलाचे अशी कमान रोडवर लागते. तेथून आत मध्ये दोन किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा ही विनंती विश्वस्तातर्फे करण्यात आली आहे.

### सोबलेवाडीत वाढत्या लोडशेडिंगमुळे नागरिक त्रस्त

# महावितरणविरोधात सामाजिक कार्यकर्त्या सुनिताताई सोबले यांचा आंदोलनाचा इशारा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** पारनेर तालुक्यातील सोबलेवाडी परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणात वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी वारंवार वीज खंडित होत विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. सोबलेवाडीसह शेरकरवस्ती, बुगेवाडी माळवस्ती, बेंदवस्ती, शेळके पठार, हा परिसर पारनेर नगरपंचायतीच्या हद्दीत येत असून शहरालगत असतानाही येथील वीजपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. नियमित आणि सुरळीत वीजपुरवठा मिळत नसल्याने घरगुती तसेच दैनंदिन कामकाजावर परिणाम होत आहे. नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी करूनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा झालेली नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे.

या संदर्भात सामाजिक कार्यकर्त्या सुनिताताई सोबले यांनी महावितरण प्रशासन तसेच संबंधित लोकप्रतिनिधींकडे वारंवार पाठपुरावा केला आहे. परिसरातील वीजपुरवठ्याच्या समस्येकडे प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले असतानाही ठोस उपाययोजना होत नसल्याने त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महावितरण प्रशासनाने तातडीने

> **सोबलेवाडी, बुगेवाडी, शेरकरवस्ती आणि माळवाडी परिसरातील नागरिक अनेक दिवसांपासून लोडशेडिंगच्या समस्येमुळे त्रस्त आहेत. याबाबत महावितरण प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडे वारंवार पाठपुरावा करूनही परिस्थितीत सुधारणा झालेली नाही. नागरिकांच्या संयमाचा अंत पाहू नये. तातडीने वीजपुरवठा सुरळीत न केल्यास महावितरण कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल.**
> **सुनिताताई सोबले, सामाजिक कार्यकर्त्या.**

या समस्येची दखल घेऊन लोडशेडिंग थांबवावे, वीजपुरवठा सुरळीत करावा आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. अन्यथा येत्या काळात महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सुनिताताई सोबले यांनी दिला आहे.

# विशेष मोहिमेद्वारे रविवारी घराघरात जाऊन गणना पत्रके भरणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–**भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत अहिल्यानगर शहर विधानसभा मतदारसंघात रविवार, दि. २६ जुलै रोजी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घराघरात भेट देऊन मतदारांकडून गणना पत्रके भरून घेणार असल्याची माहिती मतदार नोंदणी अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी दिली.

मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेअंतर्गत २० जुलै २०२६ पासून आतापर्यंत अहमदनगर शहर विधानसभा मतदारसंघातील ३ लाख १५ हजार २६४ मतदारांपैकी १ लाख ९७ हजार ७४७ मतदारांची गणना पत्रके भरून घेण्यात आली असून, हे प्रमाण ६२.७२ टक्के आहे.

मतदारसंघातील अनेक मतदार शहरातील विविध भागांत वास्तव्यास असल्यामुळे मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे रविवारी विशेष मोहिमेअंतर्गत संबंधित मतदान केंद्रांवर बीएलओ उपस्थित राहून मतदारांकडून गणना पत्रके भरून घेणार आहेत.

ज्या मतदारांनी अद्याप गणना पत्रक भरून दिलेले नाही, त्यांनी आपल्या विधानसभा मतदारसंघातील संबंधित मतदान केंद्रावर उपस्थित राहून गणना पत्रक भरून द्यावे आणि विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी आणि उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील यांनी केले आहे.

(पान १ वरून)

## जेन-झीला ड्रग्स रॅकेटमध्ये अडकविण्याची धमकी देणाऱ्या पोलिसाची बडतर्फ करा

टाकून लाठीचार्ज घडवून आणला जात असल्याचा आरोप करत, आंदोलन करणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनीं समवेत झालेल्या गैरवर्तनाची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणीही काळेंनी केली आहे. - च्या आंदोलनाला देशभरातून विद्यार्थी, पालक आणि नागरिकांचा वाढता पाठिंबा मिळत असून, ही कोट्यावधी विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या रक्षणासाठी तसेच संविधान आणि लोकशाही वाचविण्याची लढाई असल्याचे काळे म्हणाले. जमावबंदी आणि दडपशाही करून आंदोलन दडपण्याचा प्रयत्न सरकार करत आहे. हे चुकीचे आहे.

कायदेशीर मदतीसाठी हेल्पलाईन :

मुंबईतील तिरंगा रॅलीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करताना काळे यांनी सांगितले की, अहिल्यानगर सह महाराष्ट्रातील आंदोलनकर्त्यांसाठी ठाकरे शिवसेनेने कायदेशीर मदतीसाठी हेल्पलाईन सुरू केली असून, खोटे गुन्हे दाखल झालेल्या विद्यार्थी व आंदोलकांना कायदेशीर आणि आवश्यक ती मदत दिली जाईल. यासाठी . या ईमेल आयडीवर संपर्क करायचे किरण काळे यांनी आवाहन केले आहे.

## 'ज्ञानोबा–तुकाराम'च्या जयघोषात रंगला नवीन मराठी शाळा विश्रामबाग प्रशालेचा रिंगण सोहळा

हा या सोहळ्याचा केंद्रबिंदू ठरला. यानंतर शाळेच्या प्रांगणात पारंपरिक पद्धतीने रिंगण सोहळा पार पडला. रिंगणात सहभागी होताना विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. टाळ-मृदंगाचा निनाद, विठ्ठल नामाचा जयघोष आणि बाल वारकऱ्यांच्या उत्साहामुळे परिसरात अवघे पंढरपूर अवतरल्याचा अनुभव उपस्थितांना आला. रिंगण सोहळ्यात विद्यार्थ्यांनी शिस्त आणि उत्साहाचा सुंदर मिलाफ साधत वारकरी परंपरेचा आनंद अनुभवला.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेची ओळख व्हावी, संतांचे विचार आणि संस्कार त्यांच्या मनावर रुजावेत, भक्ती, शिस्त, समता व सामाजिक एकतेची भावना वाढीस लागावी, या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

अशा सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांना आपल्या संतपरंपरेचा आणि महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा जवळून परिचय होतो. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे बालदिंडी व रिंगण सोहळा आनंददायी आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या सहभागातून 'भक्ती, संस्कार आणि संस्कृती'चा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंद, उत्साह आणि एकात्मतेची भावना निर्माण झाली असून, शाळेच्या वतीने साजरा करण्यात आलेला हा बालदिंडी सोहळा सर्वांच्या स्मरणात राहणारा ठरला. या प्रसंगी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, संस्थेचे खजिनदार प्रकाश गांधी यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका विद्या गांगर्डे,पूर्व प्राथमिक वर्गाच्या इन्चार्ज वनिता चौधरी, जितेंद्र निकम,पारुनाथ ढोकळे, लीना पाटोळे, अनिता तिवारी, शिवाजी कवडे, पूजा कराळे, मनिषा कांबळे,मयूर धाडगे, कविता धर्माधिकारी,अश्विनी शिरसागर, अंकिता नलगे, योगिता कासार, साक्षी टकले, वैभव मदने, ऋतिक देसाई, चंद्रकांत सोनवणे, विशाल देशपांडे, विशाल साबळे, पूजा पानपाटील, सोनाली झेंडे,पल्लवी गिरे, उषा लोखंडे.आदी शिक्षक सहभागी झाले होते.

## दांगटमळ्यातील घरफोडीचा छडा, आरोपीकडून मुद्देमाल हस्तगत

पवार, शैलेश रोहोकले, राजू सुद्रीक, दिपक फुंदे, नवनाथ दहिफळे, किशोर जाधव, राहुल गुंडु व अरुण सांगळे यांच्या पथकाने केली.

## रिक्षा प्रवाशांना मारहाण करून लुटणारा सराईत गुन्हेगार जेरबंद

मोबाईल, चांदीची साखळी व रोख रक्कम असा ३९ हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने काढून घेतला. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाने परिसरातील सीसीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय बातमीदारांच्या माहितीच्या आधारे शुभम राजेंद्र खोसे (वय ३६, रा. लोंढे मळा, केडगाव) याने हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

## ''विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल!''च्या गजरात दिंडी

प्रमिला अल्हाट, दीपा सप्तर्षी, शीतल जऱ्हाड सौ सविता येवले , कु.गौरी गदादे तसेच इतर शिक्षक, शिक्षकेतर , पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

यावेळी अध्यक्षीय भाषणात उपाध्यक्ष दीपक ओहोळ म्हणाले, ''आषाढी एकादशी आणि वारी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख आहे. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे, तर संतपरंपरेचे संस्कार, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीवही दिली पाहिजे. अशा उपक्रमांमधून मुलांमध्ये शिस्त, एकता, सेवाभाव आणि समाजाप्रती कर्तव्यभावना निर्माण होते.''

ते पुढे म्हणाले, ''संतांनी समाजाला समता, प्रेम आणि मानवतेचा संदेश दिला. त्याच विचारांचा वारसा पुढे नेत विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि शिक्षणाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचवावे. आजची ही दिंडी केवळ धार्मिक परंपरा नसून समाजजागृतीचे प्रभावी माध्यम ठरली आहे.''

मुख्याध्यापक अजय महाजन यांनी मनोगतात सांगितले की, ''शिक्षणाबरोबरच संस्कार आणि सामाजिक मूल्यांची जोपासना करणे हे शाळेचे कर्तव्य आहे. दिंडीसारख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना संतपरंपरेबरोबरच पर्यावरण संरक्षण, स्वच्छता आणि सामाजिक जबाबदारीचे महत्त्व समजते. अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडतो.''

दिंडीची सुरुवात सांगळे गल्ली येथील श्री समर्थ विद्या मंदिरातून झाली. त्यानंतर ही दिंडी सांगळे गल्ली, चौपाटी कारंजा, चितळे रोड, नेताजी सुभाष चौक, नवी पेठ, महाजन गल्ली, लक्ष्मी कारंजा, पटवर्धन चौक या प्रमुख मार्गांवरून भक्तिमय वातावरणात मार्गक्रमण करत पुन्हा सांगळे गल्ली येथील शाळेत दाखल झाली. मार्गभर विद्यार्थ्यांच्या ''विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल!'' या अखंड नामगजरासोबत सामाजिक संदेशांचे फलक नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते. ठिकठिकाणी नागरिकांनी दिंडीचे स्वागत करत चिमुकल्या वारकऱ्यांचे कौतुक केले. भक्ती, संस्कार आणि समाजजागृतीचा संगम घडविणाऱ्या या दिंडीचा समारोप मोठ्या उत्साहात करण्यात आला.

## एनसीईआरटी-सीबीएसई अभ्यासक्रमात शिवाजी महाराजांच्या इतिहासाला न्याय द्या

यांची माहितीही विद्यार्थ्यांना मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भविष्यातील पिढीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची संपूर्ण माहिती मिळावी आणि महाराष्ट्राच्या इतिहासाचा सन्मान राखला जावा, यासाठी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने तातडीने हस्तक्षेप करून एनसीईआरटी व सीबीएसईच्या अभ्यासक्रमाचा फेरआढावा घ्यावा. छत्रपती शिवाजी महाराजांचा सविस्तर, वस्तुनिष्ठ व गौरवशाली इतिहास पूर्ववत समाविष्ट करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी खासदार नीलेश लंके यांनी केली. महाराष्ट्राच्या अस्मितेशी आणि देशाच्या इतिहासाशी निगडित असलेल्या या विषयावर केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.